**प्रेस नोट दिनांक ०९/११/२०१७**

**आंदेकर टोळीतील गुन्हेगारांना मोका.**

सुर्यकांत ऊर्फ बंडू आंदेकर टोळीतील सदस्य कुणाल सोमनाथ रावळ वय २५ वर्षे रा. ३०९, नानापेठ, डोके तालीम जवळ, पुणे व अक्षय दशरथ अकोलकर वय २५ वर्षे रा. डोके तालीमजवळ, नानापेठ, पुणे यांनी दि. २५/१०/२०१७ रोजी संध्याकाळी १८/३० वा. चे सुमारास फिर्यादी प्रतिक किर्तीकुमार सोनी हे त्यांचा मित्र नामे ओंकार राजेंद्र नगरकर याचेसह अॅक्टिव्हा गाडीवरुन जात असताना राजा धनराजगिरी शाळेसमोर आरोपी कुणाल सोमनाथ रावळ व अक्षय दशरथ अकोलकर यांनी फिर्यादी यांची गाडी अडवुन कुणाल रावळ याने फिर्यादी व त्यांचा मित्र ओंकार नगरकर यांना शिवीगाळ करुन त्याचेकडील गावठी पिस्तुल फिर्यादी यांचे कानपटीवर ठेऊन त्याचा धाक दाखवुन फिर्यादी यांचेकडुन प्रत्येक महिन्याला १०,०००/- रु. प्रोटेक्शन मनी व ५०,०००/- रुपयाची खंडणीची मागणी केली व पैसे लागलीच जमा करणेस सांगुन पैसे जमा न केल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली. सदर बाबत फिर्यादी यांनी दिले फिर्यादीनुसार समर्थ पोलीस ठाणेस दिनांक २६/१०/२०१७ रोजी गु.र.नं. २१३/२०१७ भा.दं.वि.कलम ३८४,३८७,३४१,५०४,५०६(२),३४ आर्म अॅक्ट कलम-३(२५) गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील दोन आरोपींनी संघटितरित्या खुन, खूनाचा प्रयत्न, मारामारी, खंडणी मागणे, बेकायदेशिर हत्यार बाळगणे अशा प्रकारचे अनेक गुन्हे केल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाले.

वरील सुर्यकांत ऊर्फ बंडू आंदेकर याच्या टोळीची समर्थ पोलीस स्टेशन व पुणे शहरातील भागांत दहशत असल्याने वरील दोन आरोपी व त्याचे सहा साथीदार असे एकूण ९ इसमांना दिनांक ३०/०१/२०१७ रोजी १ वर्षासाठी पुणे शहरातून हदपार करण्यात आलेले आहे.तडीपार कालावधीत पुणे शहरात बेकायदेशिरीत्या प्रवेश करून वरील गुन्हा केला होता.

वरील गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९(मोका) अन्वये कारवाई होण्यासंदर्भाने समर्थ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते यांनी प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना प्रस्ताव सादर केला होता. त्याप्रमाणे दिनांक ०८/११/२०१७ रोजी सदर गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९(मोका) अन्वये कारवाई करण्याचे आदेश दिले.

पुणे शहरातील संघटितपणे गुन्हे करणा-या टोळयांची व त्यांना छुपा पाठिंबा देणा-याची माहिती काढून त्यांचेविरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९(मोका) व एम.पी.डी.ए. अन्वये कारवाई करण्याचे सक्त आदेश पोलीस आयुक्त रश्मि शुक्ला यांनी दिलेले आहेत.

गेल्या दहा महिन्याचे कालावधीत १५ वेगवेगळया टोळयांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९(मोका) अन्वये व १९ गुंडांचे विरूध्द एम.पी.डी.ए. अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.